अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १४-२-२००७.

श्री./ श्रीमती.......................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा मंगळवार दिनांक २०-२-२००७ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका व टिप्पणी.
२. अंदाजपत्रक.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. २०-२-२००७ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१. दुखवटयाचा प्रस्ताव.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००६-२००७ सालचे सुधारित व सन २००७-२००८ सालचे बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक ( स्कुल बोर्डासह ) मा.स्थायी समितीचे शिफारशी सह मंजूरीसाठी.

३. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १४-२-२००७.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. २०-२-२००७ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय क्रमांक | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | दुखवटयाचा प्रस्ताव | टिप्पणी नाही. |
| २ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००६-२००७ सालचे सुधारित व सन २००७-२००८ सालचे बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक ( स्कुल बोर्डासह ) मा.स्थायी समितीचे शिफारशी सह मंजूरीसाठी. | अंदाजपत्रकाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना देण्यांत आल्या आहेत.मा.स्थायी समितीच्या शिफारशी नुसार मंजूरीस शिफारस आहे. |
| ३ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक : १४-२-२००७.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

मा.स्थायी समिती सभा क्र.११

विषय क्रमांक - १ दिनांक ८/२/२००६

ठराव क्रमांक - १ दिनांक ८/२/२००६

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार केलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००५-२००६ सालचे सुधारीत व सन २००६-२००७ सालचे मा.आयुक्त साहेब सादर करणार असलेले मुळ अंदाज पत्रक (म.न.पा.स्कूल बोर्डा सह ) विचारार्थ .

**ठराव** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समिती कडे सादर झालेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००५-२००६ सालचे सुधारीत व सन २००६-२०००७ सालचे बाबवार जमा खर्चाचे मुळ अंदाज पत्रक व सन २००६-२००७ सालचे जकात कराचे दरामध्ये वाढ घट करणे आणि अहमदनगर महानगरपालिका व कॅन्टोन्मेंट बोर्ड भिंगार या दोहोचेही क्षेत्रात संयुक्त जकात कर वसुली बाबतचे कार्यालयीन प्रस्ताव सभे समोर पाहिले.

मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

मा.श्री चव्हाण दि.ना.- इतर महानगरपालिकेमध्ये विशेष स्वच्छता कर नाही . तो बदलणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब ,मा.श्री गंधे मि.स.- मनपाने परवानगी दिलेल्या जाहिरात बोर्डा वर परवानगीचा क्रमांक दिनांक मुदत इत्यादीचा उल्लेख करण्यांत यावा.

मा.श्री चव्हाण दि.ना.- परवानगी व्यतीरिक्त असलेल्या हॉटेल ,हातगाडयावर खादय पदार्थ विकणारे इ.व्यवसायिकांवर अन्न भेसळ कायदयानुसार कार्यवाही करावी.

मा.श्री जोशी अ.सु. - मनपाचे शॉपिंग सेंटर मधील थकबाकी दारा कडून थकबाकी वसूल करावी करार संपलेले गाळे ताब्यात घ्यावे. उत्पन्न वाढी साठी कार्यवाही करावी.

मा.श्री चव्हाण दि.ना.- डॉ.बाबासाहेब आर्बेडकर स्मारक इमारतीतील सुधारणा सोयी चांगल्या कराव्यात लॉन लावावी. त्याचे भाडे वाढवून मिळेल अशा सुधारणा कराव्यात.

मा.श्री उडाणशिवे भा.भि.- डॉ.बाबासाहेब आर्बेडकर स्मारकाचे भाडे रूपये ५००/- गरिबांसाठी ठेवावे.

मा.सभापती साहेब - महावीर कला दालनाचे पुस्तक प्रदर्शनासाठीचे भाडे रूपये १०००/- किंवा २०००/- करावे.

मा.श्री गंधे मि.स.,मा.श्री जोशी अ.सु.- दारिद्र रेषेखालील कार्ड धारकांना रूपये ५००/- भाडे डॉ.बाबासाहेब आर्बेडकर स्मारकाचे ठेवावे.

मा.सभापती साहेब - महालक्ष्मी गार्डनला मुलासाठी रूपये १/- प्रौढासाठी रूपये २/- पांच वर्षा पर्यतचे मुलांना मोफत प्रवेश ठेवावा.मनपाचे सर्व बागेत खेळण्या बसवाव्या.



मा.श्री गंधे मि.सु.- मटन मार्केट इमारती संबधी अंदाजपत्रकात स्लॉटर शब्द वापरू नये. बेग पटांगण - मटन मार्केट करावे.

मा.श्री चव्हाण दि.ना.- बुरूडगांव रोड भाजी मार्केटचे जागी तळ घरास भाजी मार्केट वर भव्य शॉपिंग कॉम्लेक्स करावा.

मा.श्री जोशी अ.सु.- आमचे प्रभागात छोटी लायब्ररी चालू करावी.

मा.श्री गंधे मि.स.- महावीर कला दालन येथील लायब्ररी हुतात्मा स्मारक येथे आणावी.

मा.श्री जोशी अ.सु.- सावेडी क्रिडा संकुलात भरपुर जागा आहे तेथे ग्रंथालय करावे.

मा.श्री सय्यद सादिक - हातगाडी वाले, भंगार शहर हद्दी बाहेरून आणतात त्यांना जकात लावली
जाते ती कमी करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- गुंठेवारी विकास फि वसुलीसाठी घर पट्टीचे बील बरोबर गुंठेवारी विकास फि
चे हि बील प्रॉपटी धारकांना द्यावे.मनपा कर्मचा-याचे पाचवे वेतन
आयोगाची थकबाकी देण्यांत यावी.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.,मा.श्री चोपडा सं.फु.- सारस नगर मधील ओढया वरील पुल कमकुवत झाला
आहे. तो नविन बांधण्यासाठी नविन तरतुद करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.,मा.श्री चोपडा सं.फु- पारगमन फि चे सन २००६-२००७ चे उत्पन्न पाच कोटी
धरले आहे. ते रूपये ९ कोटी धरावे.
मा.श्री चोपडा सं .फु - जकात दर अनुक्रमे नं.९ वनस्पती तूप,खाद्य तेले इत्यादीवर आकारलेली
जकात वजनावर करावी .किमान दर रूपये १/- ऐवजी ०.५० पैसे ठरवावा.
मा.श्री गंधे मि.स.- साखर इत्यादी अनुक्रमे नं. ६ मधील प्रस्तावीत दर रूपये १/- ऐवजी ०.५० पैसे
ठरवावा.
मा.श्री चव्हाण दि.ना.- मिरची इ.अ.नं. २५ ची प्रस्तावीत तीन व एक ऐवजी प्रति पोत्यास किमान
रू.१०/- व कमाल रूपये ५/- धरावी.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- फटाके इत्यादीवर जकात प्रस्तावीत नाही. ती किमान रूपये २/- कमाल ७/-
ठरवावी.
मा.सभापती साहेब - डिझेल तेलावरील प्रस्तावीत किमान १.१/२ ऐवजी रूपये १/- ठरवावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- सोन्या चांदीवर अनुक्रमे नं.५४ वर प्रस्तावीत केलेली रूपये ३ /- रूपये १/-
ची जकात कमी करून किमान रूपये ०.५/- व १/- ठेवावी.
जड वाहनाचे टायर टयुब वर जकात रूपये ४/- व १/- ठरवावी. अंबाडी व अंबाडी
दोरावर रूपये २/- किमान ०.५० पैसे ठरवावी.
मा.श्री उडाणशिवे भा.भि.- भंगार गोळा करणा-या साठी विमा उतरवा. आपणस खर्च कमी येईल.
मा.सभापती साहेब - उणाड कुत्रयाचे नसबंदी साठी तरतुद वाढवीण्यात यावी.
मा.श्री गंधे मि.स.,मा.श्री जोशी अ.सु.- इलेक्ट्रीकल पोल हालविणे प्रस्तावीत तरतुद वाढवून एक
कोटी करावी. हातगाडया खरेदी तरतुद वाढवून १० लाख
करावी.क्रिडा खर्च १ लाख ३७ हजार ऐवजी २ कोटी करावी.
मा.श्री जोशी अ.सु.- बागेचे खेळणीसाठी ५० हजाराची तरतूद वाढवून ५ लाख करावी.



ट्री गार्ड साठी ५ लाख करावी. शहरातील मुख्य रस्तेचे डांबरीकरण करावे.
मा.श्री चव्हाण दि.ना.- ले आउटचे अंतर्गत सुधारणेचे पैसे आल्यानंतर ही कामे त्वरीत करावीत.
प्रभाग समित्या नेमण्यात याव्यात.
मा.सभापती साहेब - प्रत्येक नगरसेवकांना त्याचे वॉर्डातील तातडीच्या कामासाठी रक्कम रूपये
५० हजाराची तरतुद करावी.
मा.श्री जोशी अ.सु.,मा.श्री गंधे मि.स.- नविन ड्रेनेज लाईन साठी २ कोटीची तरतूद करावी. टॅन्कर
द्वारे पाणी पुरवठयाची तरतूद रूपये २५ लाख ठेवावी.
मा.श्री गधे मि.स.- भिगारदिवे मळा,प्रोफेसर कॉलनी ,सावेडी येथे जागा पाहून पे ॲण्ड पार्क च्या
साईट विकसीत कराव्यात.
मा.श्री त्रिपाठी सु.चं.- कोठीवरील जुने संडास पाडून पे ॲण्ड युज अंतर्ग त तीस शिटचे सुलभ
शौचालय बांधावे तरतुद करावी.
मा.श्री चोपडा सं.फु.- पॉर्किग साठी मनपा कार्या लयात शेड तयार करावी.
मा.श्री चव्हाण दि.ना.- चर्चा न झालेल्या मुद्यावर मा.जनरल बोर्डा मध्ये सविस्तर चर्चा करण्यांत
यावी जनरल बोर्ड सभागृहाचे नुतनी करण करून नविन फर्निचर घ्यावे.
सर्व मा. सदस्य -

शहरातील रस्ते - डांबरीकरण करणे.

१. वाडिया पार्क ते मनपा कार्यालय ते होशिंग हॉस्पीटल ते सबजेल चौक पर्यंत

ब ) होशिंग हॉस्पिटल ते मजूर अड्डा ते स्वामी विवेकानंद चौक ते मैदान आड लक्ष्मीबाई कारंजा पर्यंत

क) मजूर अड्डा ते तख्ती दरवाजा पर्यंत ते आझाद चौक ते लक्ष्मीबाई कारंजा.

१. वसंत किर्ती ते संत निरंकारी भवन प्रोफेसर कॉलनी पर्यंत.

२. अण्णाभाउ साठे चौक ते करंदीकर हॉस्पीटल पर्यंत करंदीकर हॉस्पीटल ते बालिकाश्रम रस्त्यापर्यंत

३. रेल्वे स्टेशन ते मल्हार चौका पर्यंत .

४. अ) मनपा कार्यालय ते सबजल चौक ते दो बोटी चिरा ते झारेकर गल्ली ते दिल्लीगेट पर्यंत

ब) दो बोटी चिरा ते पटवर्धन चौक ते चितळे रोड पर्यंत.

५. मनपा कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय ते पोस्ट ऑफिस पर्यंत.

६. माळीवाडा वेस ते पंचवीर चावडी पर्यंत.

७. भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा दक्षिण मुखी मारूती मंदिरा पर्यंत

८. आदर्श कॉलनी प्रोफेसर कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.

९. चौपाटी कारंजा ते तेलीखुंट पॉवर हाउस पर्यंत.

सन २००६-२००७ सालचे बाबवार जमा खर्चाचे अंदाज पत्रकावर व सन २००६-२००७ या आगामी वर्षा पासून जकात कराचे दरात वाढ घट करणे बाबत जकात अभ्यास समितीचे अहवालावर सभे मध्ये सखोल साधक -बाधक सविस्तर चर्चा करणेत येवून ही सभा सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्यानुसार जकात करामध्ये वाढ घट करणेस तसेच अहमदनगर महानगरपालिका व कॅन्टोन्मेंट बोर्ड भिंगार या दोहोच्या ही क्षेत्रात संयुक्त जकात कर वसुली बाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव निर्णयार्थ मा.मनपा सभे पुढे सादर.



तसेच मा.स्थायी समिती सदस्यांनी सुचविल्या प्रमाणे जकात नियम २००५ मधील नियमामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

१. जकात नियम २००५ मधील नियम १७ मध्ये सुधारणा

सोने चांदीचे जकात चुकवेगिरी प्रवृत्ती बाबत - अभ्यास समितीने कठोर कारवाईची शिफारस केलेली आहे. त्या मुळे नियम १७ मध्ये खालील प्रमाणे पोट कलम सुधारणा करण्यांत येत आहे.

नियम १७ (६) वरील पोट कलमांत काहीही तरतुद असली तरी जकात चुकवून आणलेला माल हा अनुसुची एक मधील बाब क्र.५४ मधील असल्यास त्यासाठी दंड किंवा तडजोड फि साठीची मर्यादा चुकविलेल्या मालाच्या जकात रकमेच्या किमान दहा पट व कमाल वीस पट अशा राहतील व त्या वरील प्रमाणे योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

२. केवळ जॉब वर्क साठी फेर निर्यातीसाठी आयात केलेल्या माला बाबत -

अहमदनगर महानगरपालिका हद्यीमधील लघु उद्योजकांनी शहर हद्यीत केवळ जॉब वर्क करून फेर निर्याती साठी आयात केलेल्या मालावर जकात आकारणी न करण्याची विनंती केलेली आहे. शहर हद्यी मधील उद्योजकांचे विनंतीचाही विचार करून नियम २७ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

नियम २७ (२) नियम २७ चे पोट कलम १ नंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यांत येत आहे.

परंतु नियम २४ (३) किंवा अन्य तरतुदी नुसार केवळ जॉब वर्क अथवा जुळणीसाठी शहर हद्यीत आयात झालेला माल पुन्हा शहर हद्यी बाहेर फेर निर्यात करतांना वरील तरतुदी नुसार गणना केलेल्या प्रशासकीय खर्चा पेक्षा प्रत्यक्ष जॉब वर्क वरील मुजूरीच्या १८ % रकमे पेक्षा प्रशासकीय खर्च जास्त होत असल्यास जॉब वर्क चे मंजूरीच्या रकमेच्या १% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वसुल करणेत येईल.

तसेच सन २००६-२००७ सालचे अंदाज पत्रका मध्ये सभे मध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्श विल्या नुसार अंदाजीत रक्कमा कमी जास्त करणेस तसेच जकात करा मध्ये मा.स्थायी समितीने सुचविलेल्या फेर बदला प्रमाणे दरा मध्ये बदल करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

अंदाज पत्रकाच्या प्रती छापून घेवून मनपा सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर

वरील प्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारशी सह सन २००५-२००६ सालचे सुधारीत व सन २००६-२००७ सालचे बाबवार अंदाजपत्रक स्कूल बोर्डाच्या शेअर्स सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री गंधे मि.स.

अनुमोदक - मा.श्री चव्हाण दि.ना.

ठराव सर्वानुमते मंजूर .

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत - १. सन २००६-२००७ चे मूळ अंदाजपत्रकात केलेले बदल .

२. जकात अभ्यास कर समितीने सादर केलेल्या प्रस्तावीत दरामध्ये केलेल्या वाढ घटी बाबत तक्ता.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

दिनांक २०-२-२००६ अंदाजपत्रकीय सभेबाबतची चर्चा.

सुरूवातीस मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी ,सभापती ,स्थायी समिती यांनी सन २००६-२००७ च्या अंदाजपत्रकात मंजुरी दिल्याप्रमाणे आपले मनोगत व्यक्त केले व सभागृहाने सदरच्या अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी असे निवेदन केले.त्यावर खालीलप्रमाणे सभागृहात चर्चा झाली.

१. मा.श्री.आसाराम कावरे -- महानगरपालिका प्रशासनाने चांगल्याप्रकारचे बजेट सादर केले याबद्यल अभिनंदन करतो. मात्र नागरिकांचे मुलभुत प्रश्न पाणीपुरवठा,आरोग्य,रस्ते,दिवाबत्ती याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे असे सुचविले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत जे चार रस्ते कॉंक्रिटीकरण करावयाचे होते तो प्रस्ताव मागील सभेमध्ये नामंजुर झाला तो प्रस्ताव मंजुरीसाठी पुन्हा घेण्यांत यावा असे सुचविले. सदरच्या रस्त्याचे आयुष्य ५० वर्षाचे आहे.

स्मशानभुमिसाठी २५ लाखाची तरतुद करण्यांत यावी.केडगांव विभागाकरीता दवाखाने सुरू करावेत.

२. मा.श्री.बहिरनाथ वाकळे -- अंदाजपत्रक स्कुल बोर्डासह मंजुरीस ठेवण्यांत आलेले आहे. तथापि स्कुल बोर्डाचे बजेट काय हे आम्हांला सांगावेत. शिक्षण मंडळाचे बजेट आम्हांला दिलेले नाही. आपल्या समोर येणे गरजेचे आहे का ? मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, महानगरपालिकेने स्कुल बोर्डाकरीता दीड कोटीची तरतुद केलेली आहे ती नमुद करून मंजुरीकरीता अंदाजपत्रक आलेले आहे. त्यावर मा.श्री वाकळे असे म्हणाले की, महानगरपालिका शिक्षण मंडळाचे बजेट मध्ये मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता मोफत गणवेष देण्यांची तरतुद करण्यांत यावी.

३. मा.श्री.अनंत जोशी -- प्रशासनाधिकारी स्कुल बोर्ड हे आजच्या सभेला हजर नसतील तर कशी मंजुरी देता येईल.

४.मा.श्री.अशोक कानडे -- बजेट परिपुर्ण आहे काय ? शिक्षण मंडळाचे अधिकारी अनुपस्थित का राहिले. शिक्षण मंडळाच्या विविध बाबीवर उदा.सर्व शिक्षा अभियान यातील जमा व खर्च सविस्तर दिलेला नाही.

५.मा.महापौर -- अधिकारी अनुपस्थित असणे योग्य नाही.

६.मा.आयुक्त -- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९५ अ मधील तरतुद वाचून दाखविली व महानगरपालिकेचा स्कुल बोर्डाचा हिस्सा सादर केलेला आहे. पुर्वीपासुन स्कुल बोर्डाचे बजेट माहितीसाठी देत असतात यापुर्वीसुध्दा सर्क्युलेट केलेले नाही. फक्त महानगरपालिकेचा हिस्सा यावरील तरतुद नमुद करावयाची आहे. सभेला प्रशासनाधिकारी नसल्यामुळे त्यांचा खुलासा घेउन्न कडक कारवाई करण्यांत येईल.

७.मा.श्री.गंधे -- शिक्षण मंडळाचे बजेट देण्यांस हरकत नाही. व नंतर चर्चा करावी.

८.मा.श्री.कानडे -- दिलेली माहिती परिपुर्ण नाही, अनुदान धरलेले नाही.

९.मा.श्री.अनंत जोशी -- मा.महापौर , मा.सभापती,स्थायी समिती व अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करून मंजुरीसाठी सादर केलेले आहे. त्याबद्यल प्रशासन अभिनंदनास पात्र आहे. जमा बाजु पेक्षा जास्त आस्थापनावर होणांरा जास्त खर्च कमी करणे आवश्यक आहे. सावेडी ड्रेनेजचा प्रश्न अनेक वेळा उपस्थित होउन्नही काम होत नाही. सावेडीची दुर्दशा संपत नाही. सदरचा प्रश्न मार्गी

लावावा. घरपट्टी महसुल सावेडी भागातुन जादा येतो वेळे प्रसंगी महानगरपालिकेने कर्ज काढुन सावेडी ड्रेनेजचा प्रश्न मार्गी लावावा.

१०.मा.श्री.शंकरराव घुले -- सभेसमोर जे अंदाजपत्रक मांडले आहे, त्या बजेट मधुन नगर विकास व शहराविषयी तळमळच दिसुन येते. अंदाजपत्रकामध्ये सर्वच काही मनासारखे होत नाही तरीपण ब-याच ठिकाणी काटकसर करून योग्य अंदाजपत्रक सादर केल्याबद्यल अभिनंदन करतो. वाचनालयासाठी एक लाखाची तरतुद केली आहे धन्यवाद. नविन वाचनालय काढुन नागरिकांची बौध्दिक तयारी करून घेणे आवश्यक आहे हे चांगले काम केलेले आहे. नगर शहरात चांगले गार्डन करावे. लक्ष्मी गार्डन अद्यावत करावे. खेळासाठी तरतुदीमध्ये वाढ केलेली आहे, व्यायामशाळा बांधणेचा उल्लेख केलेला आहे यासाठी तरतुद करावी. मिस्कीन मळा येथे पुणे मुंबई धरतीवर गार्डन करून विकास करावा. खेळाच्या स्पर्धा भरवाव्यात वाडिया पार्क येथे मोठ मोठे गाळे बांधले तथापी खेळासाठी मैदान तयार झालेले नाही.

शहरातील सक्कर रस्ता अर्धवट सोडलेला आहे तो लवकर का होत नाही त्याचप्रमाणे सारसनगर येथे जाण्यासाठी अद्यावत पुल घेण्यांत यावा व तो पुर्ण करावा. यासाठी तरतुद केल्याबद्यल धन्यवाद देतो.याशिवाय इतरही १० रस्ते दुरूस्ती व मजबुतीकरीता घेतलेले आहे त्यामध्ये यश पॅलेस ते कोठी रोड या रस्त्यावर रहदारीकरीता डायव्हर्शन करणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या घरपट्टी बाबत चांगला निर्णय घेण्यात आलेला आहे. यामध्ये स्वतःचे व धाब्याचे घरांवर गरीब नागरिकांना सवलत द्यावी. विशेषत : नालेगाव ,माळीवाडा इत्यादी भागामध्ये धाब्याचे घराची घरपट्टी कमी झालेली नाही त्याचाही विचार करावा.

जकात दर : जकातीच्या दराबाबत व्यापारी आणि महानगरपालिका यांच्यामध्ये संघर्ष झालेला होता.ब-याच आयटम वर जकात जास्त लावण्यांत आलेली होती. यापुर्वी शासनाने अनुदान देण्याचे बंद केल्यामुळे जकात कर लावणे महानगरपालिकेला भाग पडले त्यामध्ये आता दिलासा देण्यांत आलेला आहे ही बाब अभिनंदनीय आहे. महानगरपालिकेचे संकल्प चांगले आहेत भुयारी गटार योजनेत लक्ष घालणे आवश्यक आहे . याबाबत शासन दरबारी पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावणे आवश्यक आहे. संस्था चांगली चालवायची असेल त्यासाठी उत्पन्नही चांगले वाढले पाहिजे . स्कुल बोर्ड प्रश्न गंभीर आहे अधिकारी गैरहजर आहेत त्याची दखल घ्यावी,त्याचप्रमाणे मनपा शाळा ओस का पडल्या त्याचीही दखल घ्यावी व विचार करावा.

११. मा.श्री.कृ.द.जाधव : मा.महापौर, आयुक्त, उपायुक्त,सभापती स्थायी समिती व त्यांचे सर्व सहकारी नगरसेवक इत्यादी यांनी चांगले अंदाजपत्रक मांडले हे त्यांचे शेवटचेच बजेट आहे . औषधावर एक टक्का ऐवजा अर्धा टक्का जकात करावी. पेट्रोलवर कमी करावी सर्वसाधारण माणुस हद्यीबाहेर पेट्रोल भरण्यांस जात नाही. स्कुल बोर्डाचे अंदाजपत्रक वेगळे असावे व ते आम्हांस पहावयास मिळावे कारण त्यावर शासकीय ग्रँट मिळते.

मिस्कीन मळा गार्डनसाठी तरतुद करावी याबाबत २५ ते ३० वर्षापासुन तरतुद करण्यात येत आहे. यापुर्वी ५ वेळा कंपौंड वॉल बांधलेली आहे. आज तेथे कंपौंड वॉल शिल्लक दिसत नाही हे काय गौडबंगाल आहे कळत नाही. अंदाजपत्रकामध्ये न होणां-या कामाकरीता तरतुद केली जाते किंवा कसे ? अंदाजपत्रक पुर्व चर्चा करताना विरोधी पक्ष किंवा विरोधी नगरसेवकांना विश्वासात घेतलेले नाही. नगरसेवक कोणत्या पक्षाचा आहे याला महत्व नाही कमीत कमी चर्चेला तर बोलवा सर्व पक्षाचे काम सारखेच करा. महापौर निधीत वाढ न करता सदस्यांच्या निधीमध्ये वाढ करा. एकाला धरून न चालता सर्वांना धरून चालावे मार्केट विभागाकडील वसुलीकरीता ठेका

पध्दतीने द्यावे असे मी यापुर्वी सुध्दा मांडले होते. याठिकाणी खुप भ्रष्टाचार झाला आहे काही ठिकाणी घरपट्टी दिली जात नाही, तेथे कर्मचा-यांनी काय करावे.

घरपट्टीचे झोनिंग करतांना तोफखाना दिसला नाही काय ? तोफखाना विभागात घरपट्टी कमी करावी ५% नविन घर झाली आहेत तेवढी सोडुन इतरत्र तोफखाना भागात पट्टी कमी करावी. माळीवाडा,नालेगांव,तोफखाना,झेंडीगेट या भागातही कर्मचारी जावु शकत नाही. कर्मचा-यांना हाकलुन दिले जाते , त्यांना संरक्षण द्यावे वसुली करतांनाचे धोरण ठरावावे मात्र अधिका-यांनी त्यांना काहीही बोलावे असे नाही त्यावर प्रशासनाने काय कारवाई केली. वसुली कर्मचारी रस्त्यावर आहेत त्याबाबत दखल घेण्यांत यावी.

१२. मा.सौ.खरपुडे : औषधावर अर्धा टक्का जकात कमी करावी.

१३. मा.श्री.संजय चोपडा : प्रशासनाने चांगले अंदाजपत्रक सादर केले आहे, त्याबद्यल आयुक्त,उपायुक्त ,मुख्य लेखा परिक्षक ,श्री परशरामी,श्री.गोरे,श्री.लोंढे,श्री.आढाव यांचे अभिनंदन. कर्मचा-यांच्या वहान तळाकरीता शेण नाही, त्याबाबत सुचना केलेल्या आहेत त्या फक्त कागदावरच राहु नये. घरपट्टी थकबाकीचे प्रमाण वाढत आहे, त्याबाबत सवलतीची योजना जाहिर करून १ टक्का सवलत दिल्यास सर्व जण कर भरू शकतील. जकातीच्या संदर्भात चिंच हे फळवर्गिय आहे, याचा विचार करून याचा दर वजनावर लावावा. हा माल इतरत्र विकला जातो येथे रोजगारावर परिणाम होत आहे तरी जकात वजनावर अथवा पोत्यावर करावी. बी - बीयाणे सर्व बाहेर जातात त्यावरही क्विंटलवर जकात आकारावी. हळदीवरही जकात वजनावर आकारावी. लोखंड पत्र्यावर सवलत देण्यात यावी. इलेक्ट्रिक मोटारीवरील दर कमी करावी. शेती औजारेवर कमीत कमी दर आकारावेत.

१४.मा.श्री.सुनिल त्रिपाठी -- सारसनगर पुलाकरीता तरतुद करण्यांत आली याबद्यल अभिनंदन. कॅन्टोन्मेंट संयुक्त जकात कर वसुली करत असतांना पुर्वी ५० लाख रूपयाचा करारनामा होता आता १ कोटी द्यावे लागणांर आहे. त्यामध्ये ७० लाख रूपये कमी करावेत त्याचप्रमाणे विद्युत साहित्य खरेदी निविदा कधी काढणार पाण्याची टाकी आमचे भागाऐवजी अन्यत्र होवु लागलेली आहे ती आमच्या भागात करा.

संथारा व्रताकरीता व्यवस्था करावी औषधावरील जकात नागरिकांकडुन घेणांर नाही असे व्यापारी म्हणतात त्यामुळे ती जकात अर्धा टक्का करावी पेट्रोल डिझेल जकातीमुळे विक्री कमी झालेली आहे दर कमी केल्यास विक्री वाढेल व याबाबत गांभिर्याने विचार करावा.

१५. मा.सौ.भागानगरे -- सारसनगर पुल रूंद व लांब व्हावा ,पाण्याची टाकी विषय मंजुर आहे, त्यामुळे पाण्याची टाकी करावी.तसेच ९ रस्ते डांबरीकरण करण्यांत येणांर आहे. आमच्या भागातील सारसनगर ते नामगंगा हॉटेलच्या रस्त्याचाही डांबरीकरण भागामध्ये समावेश करावा.

१६. मा.श्री.सुरेश शेळके -- जकातीचे दर समितीने कमी केलेले आहेत. पेट्रोल डिझेल यावर सर्व्हे केलेला आहे. पारगमन रूपये ६० केले तर तुट भरून निघेल व आकडेवारी उपलब्ध नाही. ५ कोटी उत्पन्न कोणत्या आधारे धरलेले आहे. ज्या - ज्या वस्तुंची जकात कमी केलेली आहे,त्याबाबतची आकडेवारी प्रशासनाकडे उपलब्ध आहे काय ? स्कुल बोर्डची आकडेवारी बजेट मध्ये नाही. बजेट पान नंबर ४५ वर महानगरपालिका शाळा भाडे उत्पन्न २० लाख रूपये दर्शविलेले आहे. त्यात भाडे उत्पन्न काही झालेले आहे काय याबाबत श्री.पवळे अधिक्षक यांनी वसुलीची डिमांडची माहिती द्यावी. ज्या संस्थांनी भाडे दिले नाही त्यांच्यावर काय कारवाई केली किती शाळा आहेत किती भाडयाने दिलेल्या आहेत काही लोकांनी भाडेच दिलेले नाही काय कारवाई केली शाळा वापर सोडुन इतरत्र ब-याच खोल्या इतरांना दिलेल्या आहेत. यावर

मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, थकबाकी सर्वच वसुल करावयाची आहे, बिले दिलेली आहेत त्या लोकांना टाईम लिमिट ठरवुन देण्यांत यावे अन्यथा त्यांच्या अनुदानातुन वसुल करावे व इतर जप्तीची कार्यवाही सुरू करावी.

१७.मा.श्री.जोशी -- आकडेवारी प्रशासनाकडे उपलब्ध नाही ही चांगली गोष्ट नाही.

१८.मा.श्री.सुळ -- सदरची सर्वसाधारण सभा ही कायदेशीर आहे का ? व आपण अल्पमतात आहात का ?

(सदर भाषणानंतर सभागृहामध्ये गोंधळ.काही ऐकु आले नाही.) मनपा मोबाईल व पेट्रोलवर जास्त खर्च दाखविला आहे, हा खर्च कमी झाला पाहिजे. अत्यावश्यक खर्चात बरीच वाढ झालेली आहे. महापौर निधी रूपये एक लाख करावा. प्रत्येक सदस्यांना मात्र रूपये १० लाखाचे निधीचे बजेट असावे. महापौर निधीमध्ये ५६ लाख खर्चाची आयुक्तांनी मंजुरी कशी दिली याचा खुलासा करावा. पारगमन चा हिशोब केला तर रूपये ३ लाख ६० हजार रूपये उत्पन्न येउ शकते.

जकातीच्या संदर्भामध्ये पारगमन उत्पन्नावर ५ कोटी ऐवजी ३ कोटी वाढीव धरलेले आहे मी १२ कोटी पर्यंत वाढ होवु शकते असे सांगतो. सरासरी ३.६० लाखाचे उत्पन्न येते. त्यामुळे वरील अंदाज चुकलेला आहे. मा.उपायुक्त यांनी यावर खुलासा केला की, पारगमन पास सहा महिन्यासाठी सुचविलेले आहे. सुधारित दर लागु झाले नंतर जकातीमध्ये फरक पडणांर आहे. तथापि याबाबतची प्रत्यक्ष आकडेवारी काढणे अवघड होईल. कर आणि दर ठरविण्यांबाबत ठेकेदार यांचा संबंध येत नाही. ठेकेदाराशी करारनामा करावयाची वेळ आली तर मा.उपायुक्तांनी सांगितले की, तो विषय आज नाही शासनाच्या मंजुरीशिवाय पुन्हा करारनामा करता येणांर नाही.

औषधाचे दर ०.५० टक्के कमी करावा त्यामुळे १०० टक्के जकात वसुल होउ शकेल त्यावर आयुक्त यांनी सांगितले की, बीलावर लोकल टॅक्स आकारता येतो. तेंव्हा व्यापारी १ टक्का आकारू शकतील त्यामुळे बजेट तुट येईल याचा विचार करावा. त्यावर सुळ यांनी सुचविले की, मेडीकल वर ०.५० टक्के करावे व सर्जिकल वर २.५० टक्के करावे.

संकलीत करचे डिमांड रजिष्टर नाही धरलेले आकडे अवास्तव वाटत नाही काय सन २००५-२००६ मध्ये वसुली तफावत आहे. आता आकडे कशाला वाढविता डिमांड रजिष्टरे पुर्ण का झालेली नाहीत यामध्ये नक्की काहीतरी घोटाळा आहे. वसुली प्रमुखावर कारवाई का केली नाही. कारकुनावर लगेच कारवाई करता. त्यावर आयुक्त यांनी सांगितले की, यावर्षीपासुन संगणकावर रेकॉर्ड घेतलेले आहे. सन ९५-९६ चा प्रश्न निर्माण झालेला होता. नागरिकांना सवलती देण्यांसाठी रेटेबल व्हॅल्यु निवासी अनिवासी असे वर्गीकरण करून त्याप्रमाणे बीले दिलेली आहेत. संगणकावर असल्यामुळे आता चुका होणांर नाहीत. विडयांच्या पानावर पुर्ण जकात माफ करावी. शहरामधील श्रमिक नगर , झारेकर गल्ली,दातरंगे मळा तोफखाना इत्यादी दुर्बल घटकातील लोक राहतात यांच्या तेंदु पानांवर पुर्ण जकात माफ करावी व कष्टक-यांना दिलासा द्यावा.

शहरातील प्रमुख रस्त्यांची यादी कमी आहे, त्यामध्ये इतर ७ - ८ रस्त्यांचा समावेश करावा. पालिकेच्या शाळा इतरांना देवुन भाडे वसुल करावे , मालमत्ता अधिक्षकाची नेमणुक करावी. सावेडी भुयारी गटार योजनेचा विचार करावा.

१९.मा.सौ.बिज्जा -- विडी उद्योग डबघाईस आलेला असल्यामुळे त्यावरही जकात रद्द करावी.

२०.मा.श्री.किशोर बोरा -- रस्त्यांचे डांबरीकरण,आझाद चौक,नेता सुभाष चौक, डांबरीकरण घेण्यांत यावे. मेडिकलवर अर्धा टक्का जकात करावी. डिझेल पेट्रोलवर जकात कमी करावी. हळद आणि चिंच वजनावर जकात आकारावी. पत्रावळीवर जकात माफ करावी.

२१. मा.श्री.गारूडकर -- केडगांव भाग लोकवर्गणीची तरतुद कोणासाठी केली आहे. केडगाव भागातील इतर टाक्या कामे प्रलंबित आहे, भुषणनगर टाकीचे काम थांबलेले आहे. केलेली तरतुद कमी असल्यामुळे केडगावसाठी ५० लाखाची तरतुद करण्यांत यावी अशी मागणी केली. दलित वस्ती निधी सर्व भागात खर्च करावा त्याचप्रमाणे दलित वस्ती मध्ये १ - २ कामे कमी झाली तरी चालतील पण पाण्याची व्यवस्था करावी.

२२.मा.श्री.मिलिंद गंधे -- वसुली बाबत केलेले वक्तव्य हे कोणाच्याही व्यक्तीगत नव्हते वसुली कमी होत आहे म्हणुन व काम जास्त होत आहे म्हणुन प्रशासनाने वसुली अधिक्षक श्री.पवळे यांचेकडे असलेले विभाग कमी करावेत अशा सुचना केलेल्या होत्या. वक्तव्य हे व्यक्तीगत नव्हते. थकीत घरपट्टी ज्यांची आहे, त्यांची माहिती घेतली का अशा थकीत लोकांची नांवे आमच्याकडे द्या आम्ही प्रयत्न करू.वसुली विभागाकडील डिमांड रजिष्टरे ४ महिन्यांत पुर्ण करावीत असे आश्वासन दिले पाहिजे. वसुलीच्या संदर्भामध्ये वसुली विभागाकडील कर्मचा-यावरील कारवाई मागे घेण्यांत यावी व धरणे धरून बसलेल्या कर्मचा-यांनी धरणे मागे घ्यावे.

सावेडी भुयारी गटार योजना लवकर मार्गी लावावी याबाबत सर्व्हेक्षण झालेले आहे. ते महानगरपालिकेकडुन ४ - ५ लाख रूपये घेवुन गेलेले आहेत त्याबाबत काय झाले याचा मा.आयुक्त यांनी खुलासा करावा. याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, गिडॉन कंपनीने काम अर्धवट केलेले आहे. संपुर्ण रेकॉर्ड पाहता केंद्राचा पुर्वीचा प्रकल्प कार्यान्वीत करावा. जुनी मशिनरी कामांस आणली पाहिजे. गिडॉन कंपनीला नोटीस दिलेली आहे.

२३. मा.सौ.दिघे : अंदाजपत्रक सादर करतांना मुकूंदनगर , फकिरवाडा भागासाठी पाणीपुरवठा कामी तरतुद केलेली नाही. आताही दिवसाआड पाणी आहे. आमच्यासाठी स्वतंत्र तरतुद करा.

२४.मा.श्री.संदिप कोतकर : पाणीपुरवठयासाठी ५५ लाखाची तरतुद केली आहे ती पुरतील का ? यामध्ये कोणकोणती कामे करणांर व तो निधी केडगांव मुकूंदनगर , सारसनगर यापैकी कुठे वापरणांर.

२५.मा.श्री.शेख मुद्यस्सर : ही तरतुद कमी आहे.

२६.मा.श्री.कोतकर संदिप : ५० लाख लोकवर्गणी भरावयाची आहे. तरतुद फक्त ५ लाखाची आहे मग पैसे कधी भरणार व किती दिवस नागरिकांनी गप्प बसावे. मा.आयुक्त यांनी खुलासा केला बजेट पान नंबर ७८ वर १.९० कोटीची तरतुद मुकूंदनगर केडगांव सारसनगर यासाठी आहे.

२७. मा.सौ.दिघे : औषधावर अर्धा टक्का जकात करावी.

२८.मा.सौ.साहनी : बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी २० लाख रूपयाची लिप्ट बसविण्यांअगोदर बाळासाहेब देशपांडे इमारतीची दुरूस्ती करावी. नगरसेवकांना रूपये ३ लाखामध्ये फक्त ड्रेनेजचेच काम प्रस्तावित करा असे सांगितले आहे. रस्ते महत्वाचे नाही का ? जकात नसतांना १० लाखाची तरतुद प्रत्येक प्रभागासाठी करण्यांत आलेली होती परंतु आता जकात उत्पन्न असताना सुध्दा ३ लाखाची तरतुद करण्यांत येत आहे. मात्र महापौर निधीची आवश्यकता आहे काय ? महापौर निधी इतरत्र वळवावा.

२९.मा.सौ.सत्रे -- औषधे जीवनावश्यक असल्यामुळे त्यावरील जकात अर्धा टक्का करावी. त्याचप्रमाणे महिला व बालकल्याण समितीकरीता मा.आयुक्त यांनी भरीव तरतुद केली

त्याबद्यल त्यांचे आभार.जी.आर.प्रमाणे निधी उपलब्ध करावा. व हा निधी खर्ची पडला किंवा नाही हे पहावे निधी खर्च करण्यासाठी सक्षम अधिका-याची नेमणुक करावी मग आम्ही भरीव काम करून दाखवु.बाळासाहेब देशपांडे दवाखाना लिप्ट करीता जो निधी आहे तो बिल्डींग नुतनीकरणाकरीता वापरावा व बा.दे.दवाखान्यासाठी ॲम्ब्युलन्स खरेदी करावी. नगरसेवक निधी वाढवुन १० लाखाचा करावा. महालक्ष्मी गार्डन तयार झालेले आहे. चौकशी समितीचा अहवाल बाबत खुलासा करावा. यावर श्री.काकडे यांनी खुलासा केला की, अहवाल दिलेला आहे. यावर श्री.साठे माजी सभापती यांनी खुलासा केला की, अहवाल चुकीचा दिला. यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, अधिकारी खोटं बोलत असतील तर त्यांच्यावर कारवाई करावी याबाबत काय शिक्षा करणांर याबाबत विचारणा केली. यानंतर सभागृहामध्ये गोंधळ निर्माण झाला. यावर मा.आयुक्तांनी सांगितले की, समितीचा अहवाल आलेला नाही .

३०.मा.श्री.कानडे - अंतर्गत रस्ता समिती त्याचे काय झाले. प्रत्येक वेळी चर्चा होते. कार्यवाही नाही. मागील सभेच्या वेळी ४४ लाखाच्या भुसंपादनाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला याबाबत काहीही खुलासा झालेला नाही.

३१.मा.श्री.गंधे - मुळ कागदपत्र मिळाले नाही. त्यामुळे कामच सुरु झाले नाही.

त्यानंतर सभागृहात गोंधळ झाला.

३२.मा.श्री.शंकरराव घुले - अंदाजपत्रकावर साधकबाधक चर्चा झालेली आहे. चांगले अंदाजपत्रकाबद्दल अभिनंदन. सभागृहामध्ये महिलांनी आपापले प्रश्न मांडले व महिला चांगल्या बोलतात. बाळासाहेब देशपांडे दवाखाना हा दुर्बल व गरीब नागरिकांसाठी आहे. दुरुस्तीबाबत विचार करावा.

कर्मचा-यांनी महापालिकासमोर धरणे धरलेले आहेत. ते प्रकरण लवकर मिटवावे. कर्मचा-यांनी जास्त वसुली केली तर अशा कर्मचा-यांना अभिनंदन करुन प्रशस्तीपत्र दयावे. त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

३३.मा.श्रीमती.वर्षा सय्यद - जाहीरात कर, जागा भाडे, नोटीस फी, मालमत्ताधारकांना दिलेल्या नोटीसा इ.प्रश्न उपस्थित केले. नोटीसाचे उत्पन्न १ कोटी १० लाख धरले आहे ते कसे काय? जाहीरात बोर्ड एकूण १४० रेकॉर्डला आहेत. परंतु एकूण ५००० बोर्ड आहेत. यावर श्री.पवळे, वसुली अधिक्षक यांनी खुलासा केला की, सर्व्हे केला आहे. ३१ बोर्ड पुन्हा आढळले आहेत. याबाबत नगररचना खात्याकडून पेपर्स देणे आवश्यक आहे. यावर श्रीमती.सय्यद यांनी असे सांगितले की, या कामावर लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणजे महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

३४.मा.श्री.कृ.द.जाधव - मी कमिटी सदस्य आहे. कोणीही खोटे बोललेले नाही. जे झाले त्याचा अहवाल दिला आहे. अंतिम अहवाल यावयाचा आहे. ते पुढे येईलच.

३५.मा.श्रीमती.दहीफळे - नालेगांव, सर्जेपूरा, तोफखाना या भागाकरीता दलित वर्ग मागासवर्गीय कल्याण निधीतून टाकी करावी.

३६.मा.श्रीमती.मुदगल - स्मशानभुमीवर केलेली तरतूद कमी आहे. यावर शहर अभियंता यांनी खुलासा केला की, स्मशानभुमीकरीता एकत्रीत तरतूद केली आहे. सर्व कामे टप्प्याटप्प्याने होतील.

३७.मा.श्रीमती.गुरुड - गेल्या २ वर्षामध्ये नवीन दवाखान्याकरीता काही तरतूद केलेली नाही.

३८.मा.श्री.उडाणशिवे सभागृहात बोलत असताना गोंधळ झाल्याने काहीही ऐकू आले नाही.

अण्णाभाउ साठे यांचा अपमान होतो ही गोष्ट दुलर्क्षीत आहे. मागासवर्गीय समाजाची माफी मागावी.

३९.मा.श्री.मनेश साठे - मागासवर्गीय कल्याणासाठी ७० लाखाची तरतूद केली आहे. धन्यवाद. त्यामधून सिध्दार्थनगर येथे पाण्याची टाकी करावी अशी इच्छा आहे.

४०.मा.श्री.कानडे - दलितवस्ती सुधारणासाठी असलेला निधी त्याच कामासाठी वापरावा. एकदम ५० लाख टाकीवर खर्च करावा अशी तरतूद नको. इतरत्र खर्च होत असल्यास आमचा विरोध राहील. मा.महापौर यांनी खुलासा केला की, स्थानिक नगरसेवकांच्या मागणीवरुनच निधी खर्च केला जाईल. (सभागृहात यानंतर गोंधळ) मा.आयुक्त यांनी यानिधीबाबत सर्व संबंधीतांची मिटींग घेउन निर्णय घ्यावा. यानंतर श्री.कानडे यांनी सांगितले की, मागासवर्गीय कमिटी का स्थापन होत नाही.

४१.मा.श्री.कैलास गिरवले - अंदाजपत्रक दिलासा देणारे आहे. धन्यवाद. अतिक्रमण, अनाधिकृत बांधकाम याचे काम पाहता त्यांचा गौरवच व्हावयास पाहिजे. तथापी अतिक्रमण हे केवळ गरिबांचेच काढले जातात श्रीमंताचे काढले जात नाही. ज्या रस्त्यावरुन काहीही ट्रॅफिक नाही तेथील अतिक्रमणे काढली जातात. स्वस्तीक चौक अफालीकडे जाणा-या रस्त्यावरील एका उदयोगपतीची जागा असल्यामुळे आर्थिक व्यवहार होउन अतिक्रमणे काढली. यामध्ये शहराचा कसला विकास झाला. महापौर निधी मध्ये ४-४ कोटी टाकता. या निधीमधून एक तरी भव्य काम झाले आहे काय याचा खुलासा करावा. यावर मा.महापौर यांनी आपण अंदाजपत्रकावर बोलावे असे सुचविले. यानंतर श्री.गिरवले पुढे म्हणाले की, महापौर निधी कोठे गेला हे कळलेच नाही. त्या कामाची चौकशी केली पाहिजे. खडीकरण महालक्ष्मी उदयान भुसंपादन या कमिटयाचे काय झाले, महापौर निधीतून किती कामे झाली किती खर्च झाला याची माहिती दयावी.

१ कोटी रुपयाची मागील बीले थकीत आहेत. त्यातील किती कामे झाली व किती कामे अस्तित्वात आहेत. याची माहिती घेण्यासाठी सदस्यांची एक कमिटी नेमावी. या मुददयावर मतदान घ्यावयाचे असेल तर घ्यावे. यापुढे चौकशी होईपर्यंत कोणतीही बीले अदा करु नये. व अदा केल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील. असे सांगितले. या कमिटीमध्ये १) श्री.संदिप कोतकर २) श्री.किशोर डागवाले ३) श्री.दीप चव्हाण ४) श्री.अभय आगरकर व मी स्वत: कैलास गिरवले यांची कमिटी नेमावी. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की चौकशी करण्यासाठी एक विशिष्ट प्रक्रिया आहे. ती पूर्ण झाल्यानंतर आपले म्हणणे मांडावे. विशीष्ट कामाबददल चौकशी करता येईल. यावर श्री.गिरवले यांनी सांगितले की, आम्ही स्वतंत्र चौकशी पाहणी करतो त्यावर तुम्ही कारवाई करा.

४२.मा.श्रीमती.साहनी - महापौर निधी २ कोटी रुपयाचा असताना तो २.५६ कोटीची कामे कशी झाली.

४३. मा.श्री.अनंत जोशी - या हेडवर १ कोटीची तरतूद असताना प्रशासनाने ९० लाख कोठे खर्च केले याचा खुलासा करावा. कोणत्याही हेडवर बदल करावयाचा झाल्यास ते काम सदस्यांचे आहे तुमचे नाही.

४४.मा.श्री.कैलास गिरवले - मागील निधी ६० कोटीचा असताना बजेट ९७ कोटी रुपयाचे धरले आहे. त्यामुळे अंदाजपत्रक कशाकरीता फुगविता. कर्मचा-यावरील निलंबनाची कारवाई मागे घेण्यात यावी. वसुली विभागाकडून ब-याच लोकांना नोटीसा गेलेल्या नाहीत. त्यामुळे वसुली कमी झालेली आहे. जकात नसताना १० लाखाचा निधी देण्यात आला होता. आता जकात आहे. एस्कॉर्टचे उत्पन्न वाढलेले आहे. उत्पन्नात वाढ होणार आहे. वॉर्ड विकासासाठी निधी उपलब्ध करुन दयावा. सदस्यांना प्रत्येक प्रभागकरीता १५ लाखाचा निधी देण्यात यावा.

जकात दराबाबत प्रशासनाचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे स्थायी समिती सदस्यांचे अभिनंदन करतो. औषधाचे दराबाबत दुरुस्ती करावी.

४५.मा.श्री.दीप चव्हाण - सन २००६-२००७ च्या बजेटवर बोलतो आहे. अण्णाभाउ साठे बाबत भविष्यात अशी गोष्ट घडू नये अशी आशा व्यक्त करतो. पहिल्या वर्षी जे बजेट सादर केले ते १५ कोटी रुपयाचे डेफीशिट बजेट दिलेले होते. सन २००४-०५ मध्ये ७५ कोटीचे बजेट सादर केले ते २० कोटी रुपयाचे डेफीशिट होते. २००५-०६ मध्ये ८६ कोटीचे बजेट सादर केले त्यामध्ये १६ कोटी रुपये डेफीशिट आहे. प्रत्येक वर्षी १५ ते २० कोटी रुपयाचे डेफीशिट असताना अशाप्रकारचे बजेट सादर होते त्यामुळे आपण बजेटचे आकडे फुगवत तर नाही ना? प्रत्येक वर्षी बजेटमध्ये तुट येत आहे.

आता स्थायी समितीने ८९ कोटी रुपयाचे बजेट दिले आहे. स्थायी समितीमध्ये ५ दिवस काम चालले. अंदाजपत्रकामध्ये संकलीत करापोटी ११ कोटी रुपये अपेक्षीत जमा धरलेले आहे. सुरवातीचा हा अंदाज ८ कोटी रुपये धरलेला होता. कोणत्या आधारे धरलेला आहे. याचा खुलासा करावा. सन २००५-०६ मध्ये १० कोटी अपेक्षीत धरलेले होते. मागील ३ वर्षाचे आकडे पाहिले असता प्रत्येक वर्षी आकडे फुगीर धरले आहेत असे दिसते. वसुली विभागाकडील कुळांची संख्या वाढलेली आहे. परंतु त्याप्रमाणात वसुली वाढलेली दिसत नाही. व तशी डिमांड धरलेली नाही. तुमच्याकडे डिमांडच फिक्स नाही तर किती वसुल करावयाचे हे कसे समजणार. मागील वर्षी ६ महिन्यात डिमांड रजिस्टरे पूर्ण करु असे सांगितले असतानासुध्दा अदयाप डिमांड रजिष्टरे पूर्ण नाहीत.

जकातीबाबत ३५ कोटी रु. धरलेले आहेत. व ५ कोटी एस्कॉर्टचे धरले होते. ३३ कोटीचे टेंडर काढताना रु.२०/- एस्कॉर्टची दराची रक्कम ठरविली होती. याबाबत स्टेशनरी महापालिका देते. रस्त्यावरील पीडब्ल्युडीकडून माहिती व आकडे आणले असता प्रत्यक्षात हा आकडा १८ कोटी रुपयाचे उत्पन्न मिळू शकते. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, पीडब्ल्युडी सर्व गाडयांवर पथकर आकारते. महापालिकेला मात्र मालवाहू गाडयांवरच एस्कॉर्ट लावला जातो. त्यावर श्री.दीप चव्हाण यांनी असे सांगितले की, आकडेवारी कमीजास्त होउ शकतो. पारगमन उत्पन्न १२ कोटीचे वर जाउ शकते. शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक डिटेल दयावयाचे नसेल तर यात कशाला धरता. राहीलेल्या खर्चात डिटेलमध्ये जाण्याची आवश्यकता नाही. त्यानंतर महालक्ष्मी उदयान टिळकरस्त्याचे काम प्रश्न उपस्थित केले. संयुक्त जकात कराबाबत १ कोटी कॅन्टोन्मेंटला शेअर देणेचा प्रस्ताव सादर केला आहे त्याचा खुलासा करावा. याबाबत जकात अभिकर्ता यांनी ३५ लाख देणेबाबत सुचविले आहे याबाबत विचार करावा.

दलित वस्तीकरीता ३९ लाखाची तरतूद असताना याकडे लक्ष दिले जात नाही. कमिटया नेमल्या जात नाहीत. सभासदांना योग्य उत्तरे दिली जात नाहीत. सिध्दार्थनगर भागामध्ये पाण्याची टाकी बांधणे ही काळाची गरज आहे. याकरीता अधिकृत तरतूद करावी.

महापौर निधीबाबत कोठेही कायदयात तरतूद नाही. एकाच कामासाठी २-२ निधीतून खर्च केले जातात. सर्व हेड असताना खर्च इकडे तिकडे का दर्शविला जातो प्रशासकीय कालावधीत घेतलेले रस्ते कधी पूर्ण करणार. श्री.देवरा यांनी सुचविलेल्या रस्त्याचे कामाचे काय झाले.

जकात दराबाबत व्यापा-यांनी आंदोलन केले. व्यापार टिकला पाहिजे. त्यामुळे शहराचाही विकास होतो. व्यापा-यांचे आलेल्या प्रस्तावानुसार प्रशासनाने सुचविलेले दर हे चांगल्या प्रकारे केलेले आहेत. त्यामुळे प्रशासनाचे धन्यवाद. औषधावर मेडीकल असोसिएशन

यांनी विनंती केल्यानंतर अर्धा टक्का जकात केल्यास एकूण उत्पन्न वाढू शकते. रॉकेल, कोळसा, लाकूड १ टक्का, पेट्रोलवर २ ऐवजी १ टक्का करावा.

बोल्हेगांव परिसरामध्ये दलित वस्ती निधीतून कामे करावीत. दलित सदस्यांची कमिटी नेमावी. निधीचा वापर व्यवस्थीत करावा.

४६. मा.श्री.अनंत जोशी - सांगली मिरज कूपवाड महापालिकेमध्ये औदयोगिक वसाहतीला जकात माफ आहे. त्याप्रमाणे अहमदनगर येथेही औदयोगिक वसाहतीला जकात माफ करावी. जॉब वर्कवर १ टक्का ऐवजी अर्धा टक्का करावी. पेट्रोल २ ऐवजी १ टक्का करावा. मेडीकलवर १ टक्का ऐवजी अर्धा टक्का करावा.

४७.मा.श्री.कानडे - डिमांड रजिष्टरे पाणीपटटी रजिष्टरे जमा व्यवस्थीत नाही. जाहीरात बोर्ड साशंकता आहे. दर व कर कमी केले काय त्याचा परिणाम सांगता आलेला नाही.

स्टॅपींग पॅटर्न काहीही सांगता आले नाही. जकातीचे पारगमनबाबत ३ वेळा आकडे बदललेले आहेत. तर हे बजेट बोगस आहे काय? असा प्रश्न पडतो. मागील अंदाजपत्रकातील काही कामे झालेली नाहीत. नेहमी सांगितले जाते की, हेडवर तरतूद शिल्लक नाही. मग काय करायचे. महापौर निधीबाबत समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत. तेव्हा अंदाजपत्रक बोगस आहे काय याचा खुलासा करावा. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, खातेप्रमुख यांनी १.७ कोटीचे अंदाजपत्रक धरले होते मी अभ्यास करुन ८१ कोटीवर आणलेले आहे. दरवर्षी बजेटमध्ये फरक पडलेला आहे. कानडे यांनी सांगितले की, मागील वर्षीच्या बजेटमध्ये एकही काम झालेले नाही. त्यामुळे सभागृहात गोंधळ झाला. त्यानंतर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की जे अंदाजपत्रक सादर केलेले आहे ते वस्तुस्थितीस धरुन आहे. बोगस नाही. त्यावर श्री.कानडे यांनी सांगितले की, डिमांड रजिस्टरे पूर्ण नाहीत त्यावर आपण काय केले. यावर उपायुक्त यांनी खुलासा केला की, वसुली विभागास वारंवार सुचना देण्यात आल्या होत्या.

यावर श्री.कानडे यांनी पुढे भाषणात सांगितले की, घरपटटी आकारणीबाबत ४ झोन केले ही कल्पना चांगली आहे. मात्र अंदाजपत्रक झोनला धरुन झालेले नाही. सुचविलेली कामे सांगताना बजेट शिल्लक नसते. झोनवाईज बजेट का ठरविले नाही. नागरिकांवर घरपटटीबाबत अन्याय झाला आहे त्यामुळे वसुली का होत नाही हे पहावे. घरपटटीमध्ये २५ टक्के सुट देणेबाबत पॅकेज देणे आवश्यक आहे.

महापौर निधी हा सदस्य निधीकडे वर्ग करण्यात यावा. भुयारी गटारीकरीता ५ कोटी रुपये स्मशानभूमीकरीता १५ लाखाची तरतूद करावी. नागापूर बोल्हेगांव येथे पाण्याची टाकी केली पण पाण्याची लाईनच नाही. तेथील २-३ नगरसेवकांना बरोबर घेउन फिरावे व नागरिकांचे प्रश्न पहावे. नागापूर बोल्हेगांव याकरीता स्वतंत्र ५० लाखाची तरतूद करावी.

महिला बचत गट मोठया प्रमाणावर स्थापन होत असल्याने त्यांचे उत्पादनावर संपूर्ण जकात माफ करावी. आंबेडकर स्मारकाची अवस्था फारच वाईट झाली आहे. मागासवर्गीय कल्याण निधीतून सदरचे स्मारक चांगले सुशोभित करावे. शहरातील डांबरीकरणासाठी २ कोटी रुपयाची तरतूद केली आहे. परंतु ब-याच भागात रस्ते नाहीत. बोल्हेगांव फाटा रस्त्याचा समावेश करावा. पे ॲण्ड युजच्या शौचालयाबाबत अघोषीत झोपडपटटयामध्ये नागरिकांना काही अशी अनुदान देवून व खर्च करणार असेल तर करावा.

४८.मा.श्री.कावरे - इंगळे यांनी पैसे भरलेले आहेत. त्यांना कामावर घ्यावे. पाणीपटटी रु.१५०० ऐवजी ९००/- रु.करावी. काटवन खंडोबा रस्ता पुलासह करावा.

४९.मा.श्री.गिरवले - इंगळे यांनी सर्व पैसे भरल्याने निलंबन मागे घ्यावे. फौजदारी काढून घ्यावी. चौकशी करावी. ७६ कामगारांना ५वा वेतन आयोग लागु करावा. ते फरक सोडण्यास तयार आहेत.

५०.मा.श्री.शेख सादीक - मोहरमसाठी ३० ते ५० हजार खर्च करण्यात येतो. त्यासाठी एकत्रीत १० लाखाची तरतूद करावी. रामवाडी झोपडपटटी मुलभूत सुविधांपासून वंचित आहे.

५१.मा.श्री.शेख मुदस्सर - हददवाढीतील गावांसाठी तरतूद करावी. संयुक्त जकात वसुली करावी. नगरसेवकासाठी १५ लाख निधी करावा.

५२.मा.श्री.संदिप कोतकर - केडगांव उपनगरासाठी भुयारी गटार योजना कधी करणार. सावेडी विभागासाठी केलेली तरतूद पाहता संपूर्ण शहरासाठी नियोजन करु शकाल काय. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, टप्प्याटप्प्याने योजना कराव्या लागतील. प्रथम पाण्याची योजना करणे आवश्यक आहे. कारण ड्रेनेजसाठी पाणी आवश्यक आहे. यावर श्री.कोतकर पुढे म्हणाले, केडगांव सर्वेक्षण लगेच सुरु करावे. आम्ही शासनाकडून पैसे आणतो.

जिल्हाधिकारी कार्यालयापासून जनरल पोस्ट ऑफिस पर्यंत कॉंक्रीटीकरण चालू आहे. हा रस्ता डांबरीकरणासाठी का घेण्यात आला? मागासवर्गीय भागातील पाण्यासाठी ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

५३.मा.श्रीमती.शिंदे - बी बीयाणे ची जकात किंमतीवर लावण्यात आली आहे त्याऐवजी वजनावर लावण्यात यावी.

५४.मा.श्री.अभय आगरकर - सन २००६-०७ चे अंदाजपत्रकावर बोलताना सांगितले की, मागील वेळी अनेक व्यापारी नागरीक प्रेक्षक गॅलरीमध्ये उपस्थित होते. त्यावेळेस बोर्ड गाजले होते. परंतु आजच्या अंदाजपत्रकीय सभेला अनुपस्थिती आहे. ही कृती संकल्पनेची १ली पायरी आहे. यादृष्टीने वाटचाल उपक्रम हे उठून दिसते. सर्वांचे स्वारस्य त्यात असल्याने स्थायी समितीने दिलेले बजेट व उचललेले पाउल हे अभिनंदनास पात्र आहे. हे बजेट दिलासा व न्याय देणारे असल्याने ते महापौर यांनी सभेपुढे मांडले. याबाबत या अंदाजपत्रकाचे मी समर्थन करतो. यामध्ये नागरिकांच्या अपेक्षा असतील, मा.सदस्यांच्या अपेक्षा असतील ते अंदाजपत्रक परिपूर्ण आहे. यासाठी आयुक्त, उपायुक्त, स्थायी समिती सभापती, अधिकारी व लेखापरिक्षक, लेखापाल यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे महिला सक्षमीकरणाची वाटचाल या अंदाजपत्रकात आहे. पाणी हे जीवन आहे. त्यावर भरीव तरतूद करुन महिलांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झालेला आहे.

जाहीरात बोर्ड ज्या ज्या वेळी शहरामध्ये लावले जातात त्या जाहीरात बोर्डावर मंजुरी दिल्याचे तारीख व जाहीरातीची मुदत नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे.

पारगमन पास याबाबत मी अशोक बिल्डर्स ग्रुप यांच्याकडून जाणा-या वाहनांची माहिती घेतली आहे. महापालिकेची प्रस्तावित वाढ पाहता जास्त आहे. सर्व रस्त्याची आकडेवारी आणलेली आहे. अपेक्षीत उत्पन्न जास्त होईल. ९ लाख रुपयाचे उत्पन्न धरले तर ती अतिशयोक्ती होईल. जादा लोड असलेल्या गाडया किती जातात याचा सर्व्हे केला पाहिजे.

वाचनालयाकरीता ६ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. तेथे ज्या प्रमाणात पुस्तकांची संख्या वाढेल त्या प्रमाणात संगणकीकरण करणे आवश्यक आहे. त्याकरिता इंटरनेट सुविधाही उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरीता पुणे विदयापीठाचे वाचनालय पाहणे संयुक्तीक होईल.

व्यायामशाळा बांधणेकरिता तरतूद करणे असे सुचविले आहे. तथापी आजतरी त्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत चिंतन करणे जरुरीचे आहे. क्रिडा सांस्कृतिक वारसा टिकविण्याचा प्रयत्न केला आहे. रस्त्याबाबत जी भरीव तरतूद करण्यात आली आहे. त्याकरीता श्री.एन.डी.कुलकर्णी यांचेसारखे अनुभवी इंजिनिअर असल्यामुळे त्यांचेकडून पीडब्ल्युडीच्या कामासारखे कामे करणे अपेक्षीत आहे.

सारसनगर पुल करत असताना त्याव्यतिरिक्त इतर पुलांचीही दुरुस्ती करावी. याकरिता आयुर्वेद कॉलेजजवळून सिना नदीकडे जाणा-या पुलाचा विचार करावा. नवीन रस्ते करत असताना मागील रस्त्यांचे काय असा प्रश्न उपस्थीत होतो. गेल्या २ वर्षातील रस्ते पूर्ण होत नाहीत तर आता संकल्प पूर्ण होणार नसतील तर नवीन रस्ते कशाला घेता. आगरकरमळा, केडगांव भागातील पाण्याच्या टाक्या पूर्ण झालेल्या आहेत. त्याच्या पाईपलाईन पूर्ण कराव्यात. व या कामाकरिता निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

नवीन रस्ते प्रस्तावित करताना मागील टिळकरोड, सक्कर चौक रोड, अमरधाम रोड इ. रस्ते गेल्या २ वर्षापासून पूर्ण होत नाहीत. यासाठी कृतीसंकल्पनाची अंदाजपत्रकात छाप आहे काय. सुचविलेले रस्ते पूर्ण करा व संकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे.

संकलीत कर पुर्नरचनाबाबत सर्वांना धन्यवाद. झोनपध्दतीमुळे करवसुलीस चालना मिळणार आहे. जकात कर पुर्नरचनेमध्ये अनेकांनी सुचना केलेल्या आहेतच. पेस्टीसाईडमध्ये १ टक्का दुरुस्ती करावी. ऑफसेट केमीकलवर १ टक्का करावे. जॉबवर्कवर १ टक्का करावे. मा.आयुक्त यांनी नियम २७ मध्ये सुधारणा केलेली आहे.

जकात चुकवेगिरी करुन आणलेल्या मालाबाबत गाडी सेंट्रल गोडावूनला लावली जाते व १० पटीची मागणी करण्यात येते. मात्र सेटलमेंट करुन व्यवहार केला जातो. अशी रक्कम वस्तुतः महानगरपालिकेत भरावयास पाहिजे. अशी दंडाची रक्कम एकदाही भरलेली दिसत नाही. अशा प्रकारे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

पवन उर्जा प्रकल्प कालबध्द कार्यक्रम असेल तर पूर्ण होईल. यामुळे महानगरपालिकेचे दरवर्षी ६ कोटी रुपये वाचू शकतात. त्यामुळे नगरसेवकांना जादा निधी प्रभागाकरीता उपलब्ध होउ शकेल. भुयारी गटारी योजनाबाबत मा.सदस्यांनी वेळोवेळी मांडलेल्या भावनांमुळे अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक आहे.

महानगरपालिका कर्मचारी यांचेकरिता गुणवत्ता योजना संकल्पीत करणे त्याचप्रमाणे आपत्कालीन प्रशिक्षण विकास कार्यक्रम आखणे व कर्मचा-यास प्रशिक्षण दयावयास पाहिजे. ३०-३५ वर्षे एकाच ठिकाणी काम करीत असताना कर्मचा-यांना पदोन्नती नाही त्यामुळे त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

सेंट्रल गोडावूनचे भाडे वाढ करणे आवश्यक आहे.

शहरातील नागरिकांकरीता कुत्र्यांचा बंदोबस्त करणे.

प्रसिध्दी अधिकारी बरेच दिवसापासून बिनपगारी रजेवर आहेत. त्यांना कामावर घेणे आवश्यक आहे. त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांना कारवाई करु शकता. व कर्मचारी सुधारणेचा कार्यक्रम राबवावा व यशदा संस्थेकडूनही अधिकारी बोलवावेत.

५६.मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी - अंदाजपत्रकावर साधकबाधक चर्चा झालेली आहे तेव्हा सदस्यांनी या अंदाजपत्रकास मंजुरी दयावी.

५७.मा.श्री.दीप चव्हाण - वैदयकीय सहाय्य योजना जाहीर करावी, असे सांगितले.

५८.मा.श्री.अभय आगरकर - पुणे महानगरपालिकेने सहयाद्री हॉस्पीटल यांचेशी करार केला आहे. व त्या धर्तीवर अहमदनगर मनपाने करार करावा. व सामान्य माणसांना सुविधा कशी देता येईल ते पहावे. त्यानंतर कॅन्टोन्मेंट हा शहराचाच भाग आहे. तेव्हा त्यांना १ कोटी हिस्सा देण्याबाबत विचार करावा.

५९.मा.श्रीमती.साहनी - सभागृह नुतनीकरणाबाबत यापूर्वी तरतूद केली होती. ते काम होणार आहे काय. याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, बेग पटांगणामध्ये ज्या वेळी इमारत होणार आहे त्यामध्ये हा प्रस्ताव आहे.

६०.मा.श्री.कृ.द.जाधव - अंदाजपत्रकाबाबत आपण सर्व वर्षाचे नियोजन करत असतो. त्यामुळे सर्वांना बोलण्याची संधी मिळणे आवश्यक वाटते.

सक्कर चौकाचे बंद केलेले काम आता परत का सुरु केले. त्याचा खुलासा करावा. असलेल्या व्यायामशाळा चांगल्या कराव्यात. तोफखाना, माळीवाडा, नालेगांव येथे घरपटटी अन्यायकारक झाली आहे. त्यावर फेरआकारणी करावी. उन्मत्त कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. नसबंदी करुन उपयोग नाही. काही कुत्रे मारावेच लागतील. मोकाट डुकरांचाही बंदोबस्त करावा.

स्कूलबोर्डाकरीता १.५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. व ३ कोटीचे बजेट आहे. यामध्ये नवीन उपक्रम काहीच नाही. आकडयांचा मेळ बसत नाही. भाडयाने दिलेल्या शाळांचे भाडे वसुल करावे.

६१.मा.महापौर - यांनी आपल्या अंदाजपत्रकीय भाषणात सांगितले की, मी चौथे अंदाजपत्रक सादर करीत आहे. मागील वर्षी राहीलेले कामे पूर्ण करणे, नवीन प्रस्तावीत कामे मार्गी लावणे यामध्ये प्रामुख्याने पाणीपुरवठा, रस्ते, दिवाबत्ती, उदयाने इ. तसेच दुर्बल घटक व झोपडपटटयातील विविध कामे पूर्ण करण्याचा निर्धार केला. उपनगरातील सर्व मुलभूत कामे पूर्ण करणे जकात दराबाबत सुचविलेल्या सुधारणासह अंदाजपत्रक मंजूर करावे असे आवाहन केले. पारगमन प्रस्तावाबाबत पुन्हा ६० रु. व १०० रु.असे धरावे असे सुचविले. सभागृहात गोंधळ. त्याचप्रमाणे नगरसेवक निधी १५ लाख रुपये करावा असे गोंधळात सुचविले.